ग्रामपंचायत अधिकारी या पदावर जिल्हा परिषद सेवेमध्ये पुन:स्थापित करणेबाबत.
(श्री अशोक बप्पासाहेब नरसाळे, ग्रामपंचायत अधिकारी,ग्रामपंचायत-देवटाकळी,ता.शेवगाव)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/ २० /२०२६
दिनांक-१९ /०१/२०२६

संदर्भ - १. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर यांची दि.१०.१२.२०२५ रोजी ग्रामपंचायत देवटाकळी,ता.शेवगाव येथे दिलेली भेट.
२.या कार्यालयाचे आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/३०१/२०२५,दिनांक ११/१२/२०२५
३. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) १९६४ मधील नियम (६)(३) व (५)
४. गटविकास अधिकारी पंचायत समिती शेवगाव यांचेकडील पत्र क्र. आस्था-२/६५२/२०२५, दिनांक २३/१२/२०२५. (ई-८०३४८५३)
५. शासन निर्णय क्र.निप्रआ११२२/प्र.क्र.०९/विचौ २/२०२५,दिनांक २२ एप्रिल २०२५.

संदर्भ क्रमांक ०२ चे आदेशान्वये श्री अशोक बप्पासाहेब नरसाळे,ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत देवटाकळी, ता.शेवगाव येथे ग्रामपंचायत कार्यालयीन कामी पुर्णवेळ उपस्थित न राहणे, कर आकारणी व कर वसुली मध्ये अक्ष्यम्य दुर्लक्ष असणे, ग्रामपंचायत अभिलेखे अपुर्ण असणे तसेच मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानामध्ये असमाधानकारक कामकाज असणे याबाबी संदर्भ क्र.१ च्या भेटीमध्ये दिसुन आल्या असुन अशा प्रकारचे ग्रामपंचायत कार्यालयीन कामी गैरवर्तन केल्याने जिल्हा परिषद सेवेतुन सेवानिलंबित करणेत आलेले आहे.

संदर्भ क्र.४ च्या अहवालानुसार ग्रामपंचायत देवटाकळी येथील भेटी दरम्यान श्री अशोक बप्पासाहेब नरसाळे हे घरकुल भेटी साठी व ग्रामपंचायत वसुली मागणी कामी देवटाकळी येथील वाघमारे वस्ती येथे गेले असलेची शहानिशा झाली आहे व दप्तरातील आढळलेल्या त्रुटीची पुर्तता करण्यात आली आहे. अहवालानुसार दप्तर तपासणी मध्ये ग्रामपंचायत नमुने न १ ते ३३ हे अदयावत करण्यात आलेले असुन त्या अनुषंगाने असणारे सर्व अभिलेखे समाधानकारक अदयावत करण्यात आलेचे दिसून आले आहेत. याबाबत तपासणी करुन खात्री करण्यात आलेली आहे. तसेच अहवालानुसार मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान अंतर्गत कामे समाधानकारक सुरु असल्याचे खात्री करण्यात आलेली आहे. सबब संदर्भ क्रमांक ५ च्या शासन निर्णयानुसार १ (फ) अन्वये व महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे पोट नियम ३(५) अन्वये, मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सक्षम प्राधिकारी

जिल्हा परिषद अहिल्यानगर या आदेशान्वये श्री अशोक बप्पासाहेब नरसाळे,ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत देवटाकळी, ता.शेवगाव यांना ग्रामपंचायत अधिकारी या पदावर जिल्हा परिषद सेवेत पंचायत समिती नेवासा -------- येथे पुन:स्थापित करीत आहे.

श्री अशोक बप्पासाहेब नरसाळे,ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायंत देवटाकळी, ता.शेवगाव यांचा सेवा निलंबन कालावधीचा निर्णय, पुढील सुरु असलेली शिस्तभंगविषयक कार्यवाही पुर्ण झालेनंतर स्वतंत्ररित्या घेण्यात येईल. जिल्हा परिषद सेवेत पुन:स्थापित आदेशाची नोंद, श्री अशोक बप्पासाहेब नरसाळे, सेवानिलंबीत ग्रामपंचायत अधिकारी यांचे मुळ सेवा पुस्तकात संबंधित खातेप्रमुख यांनी घ्यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०११२०६०००४........ असा आहे.

(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१. श्री अशोक बप्पासाहेब नरसाळे,ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत देवटाकळी, ता.शेवगाव
(सेवानिलंबन मुख्यालय पंचायत समिती नेवासा)
व्दारा :- गटविकास अधिकारी, पंचायत समिती नेवासा/शेवगाव.
२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती नेवासा/शेवगाव.
२/-सोबतचा आदेश संबंधितास बजावून तो मिळालेबाबतची पोहोच कार्यालयास सादर करावी.
३. गटविकास अधिकारी, पंचायत समिती नेवासा/शेवगाव.यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
४. गटविकास अधिकारी, पंचायत समिती --नेवासा-----------
३/- श्री अशोक बप्पासाहेब नरसाळे, सेवानिलंबीत ग्रामपंचायत अधिकारी हे हजर झालेनंतर अहवाल इकडेस सादर करावा.